# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र.MHSICMU/२०२३/M/००३५४५**

**अपिलार्थी श्रीमती जॉईस रॉजर डिअॅब्रिओ**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक**
हॉली क्रॉस हायस्कूल, कमानी, कुर्ला (प), मुंबई-७०

**प्रथम अपिलीय अधिकारी**
हॉली क्रॉस हायस्कूल, कमानी, कुर्ला (प), मुंबई-७०

**<u>द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०६.०५.२०२५</u>**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित (ट्रकिंग रिपोर्ट नुसार दि. १६.०४.२०२५ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे) |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित (ट्रकिंग रिपोर्ट नुसार दि. १६.०४.२०२५ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे) |

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २२.१२.२०२२ | १७.०१.२०२३ | ०१.०२.२०२३ | - |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १८.११.२०२३ रोजीच्या अर्जान्वये माझ्या प्रस्तावाला जोडलेला नियुक्ती पत्राची चुकीची सत्यप्रत दिली असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. १७.०१.२०२३ संलग्न केले आहेत.

अपिलार्थी यांनी दि. २२.१२.२०२२ रोजीच्या माहिती अर्जानुसार हॉलीक्रॉस हायस्कूल कुर्ला येथील सन २०११ ते २०१३ या कालावधीत नियुक्त केलेल्या सर्व शिक्षकांचे School appointment letters, newspaperadvertisement copy व school management resolution ह्या सर्वांची सत्यप्रत मिळणेबबत माहिती विचारलेली होती. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि. १७.०१.२०२३ रोजीच्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी प्रस्तावाला जोडलेल्या नियुक्ती पत्राची चुकीची सत्यप्रत दिली म्हणून अपिलार्थी यांनी दि. ०१.०२.२०२३ रोजी प्रथम अपिल दाखल केले.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित असून जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांनी आयोगासमोर सादर केले की, एका अन्य माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांच्या नियुक्तीची तारीख दि. १५.०६.२०१२ नमूद करण्यात आली आहे व आता जन माहिती

अधिकारी यांनी दि. १७.०१.२०२३ रोजी दिलेल्या माहितीमध्ये त्यांची नियुक्तीचा दि. ०९.०९.२०२३ दाखविण्यात आलेली आहे याबाबत त्यांना स्पष्ट माहिती हवी आहे.

सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर विषयाबाबत वस्तुस्थितीदर्शक माहिती घेऊन पुढील सुनावणीस उपस्थित राहावे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. २८.०५.२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता घेण्यात येईल.**

मुंबई
दिनांक : ०७.०५.२०२५

7-5-2025
**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

State Information Commission Greater Mumbai

**अपील क्र. MHSICMU/२०२३/M/००३५४५**
**अपिलार्थी श्रीमती जॉईस रॉजर डिअॅब्रिओ**
**सुनावणी दिनांक : २८.०५.२०२५ (In continuation of order dt ०७.०५.२०२५)**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. १६.०५.२०२५ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. १६.०५.२०२५ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी आयोगाने जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर विषयाबाबत वस्तुस्थितीदर्शक माहिती घेऊन पुढील सुनावणीस उपस्थित रहावे असे आदेशित केले होते.

आजच्या सुनावणी वेळी अपिलार्थी उपस्थित असून जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगाच्या कार्यालयाने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संपर्क केला असता जन माहिती अधिकारी यांनी असे नमुद केले की, ते कार्यालयीन कामकाजामुळे आजच्या सुनावणीस उपस्थित राहू शकले नाहीत. त्याबाबत दिलगिरी व्यक्त केली व त्यांनी दि. २९.०५.२०२५ रोजी सुनावणीस उपस्थित राहण्याचे मान्य केले.

अपिलार्थी यांनी दि. २९.०५.२०२५ रोजी सुनावणीस उपस्थित राहण्याची तयारी दर्शविली.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. २९.०५.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात येईल.**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : २८.०५.२०२५**

**अपील क्र. MHSICMU/२०२३/M/००३५४५**
**अपिलार्थी श्रीमती जॉईस रॉजर डिअॅब्रिओ**

**सुनावणी दिनांक : २९.०५.२०२५ (In continuation of order dt २८.०५.२०२५)**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी आयोगाच्या कार्यालयाने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालाशी संपर्क केला जन माहिती अधिकारी यांनी असे नमूद केले की, ते कार्यालयीन कामकाजामुळे आजच्या सुनावणीस उपस्थित राहू शकले नाहीत. त्याबाबत दिलगीरी व्यक्त केली व त्यांनी दि.२९.०५.२०२५ रोजी सुनावणीस उपस्थित राहण्याचे मान्य केले. अपिलार्थी यांनी दि. २९.०५.२०२५ रोजी सुनावणीस उपस्थित राहण्याची तयारी दर्शविली असे आदेशित केले होते.

आजच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित असून अपिलार्थी यांनी आयोगास विनंती केली की, त्यांना दि. १५.०६.२०१२ रोजी शिक्षण निरीक्षक कार्यालय, होलीक्रॉस हायस्कूल द्वारे पाठविण्यात आलेल्या प्रस्तावाची प्रत अपेक्षित आहे. जन माहिती अधिकारी यांनी प्रकरणाची पार्श्वभूमी विशद करुन असे नमूद केले की, वर्ष २०१२ मध्ये शाळेतर्फे शिक्षण निरीक्षक कार्यालयात तसा प्रस्ताव पाठविण्यात आलेला आला होता. पण प्रशासकीय धोरणामध्ये सदर प्रस्तावावर पुढील कार्यवाही झालेली दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, जून २०१२ मध्ये शिक्षण निरीक्षक कार्यालयात पाठविण्यात आलेल्या प्रस्तावाची प्रत व कव्हरींग लेटर मध्ये पार्श्वभूमी नमूद करुन अपिलार्थी यांना आदेशप्राप्तीच्या १० दिवसात नोंदणीकृत टपालाने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७(६) अन्वये निशुल्क पाठविण्यात यावे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१) जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार कार्यवाही करावी.**

**२) अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

मुंबई
दिनांक : २९.०५.२०२५